Historicity Research Journal
Volume 1 | Issue 3 | Nov 2014
ISSN:- 2393-8900

Research Article

अण्णाभाऊ साठे यांची सामाजीक बांधीलकीपर वगनाटये : एक चिकित्सक अभ्यास

सदाशिव कमळकर

(सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग) स्वामी विवेकानंद वरीष्ठ महाविद्यालय ,
मंठा ता मंठा जि जालना.

सारांश :-

अण्णाभाऊ साठे हे जनमताची कदर करणारे लोककवी होते. लोकांविषयी लोकांसाठी लोकभाषेत लिहीणारा लोकशाहिर होते. म्हणूनच मराठी शाहिरीकाव्याचा सरताज असा त्यांचा उल्लेख केला जातो. ''जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करते.'' हे मी प्रथम शिकून नंतर लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. अशी आपल्या समग्र लेखनामागची भूमिका त्यांनी 'वैजयंता' या कादंबरीच्या प्रस्तावनेत विशद केली आहे. एक कलावंत म्हणुन त्यांनी जनतेशी बांधीलकी स्वीकारली होती. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' लेखन करणाऱ्या जनवादी पंथातील ते लेखक होते. समाजाभिमुख होऊन त्यांनी यथार्थवादी, वास्तववादी कला निर्मीती केली.

प्रस्तावना :-

अण्णाभाऊनी जशी जनतेशी बांधिलकी स्वीकारली तशीच स्वतःच्या अनुभवाशी बांधीलकी स्वीकारली म्हणूनच त्यांचे शाहीरीकाव्य हे वास्तववादी आहे, काव्य हे कालनिरपेक्ष आहे असे मानले जाते. एकाअर्थाने ते सर्वसाधारणपणे खरेही असले तरी कवीला विशेषतः शाहिरीकवीला वर्तमानकाळाचे म्हणजे तो ज्याकाळात जगतो त्या 'समकालाचे' भान ठेवावे लागते. अण्णाभाऊना ते भान होते. म्हणूनच त्यांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारली होती. जनतेशी, काळाशी आणि अनुभवाशी बांधिलकी स्वीकारली की, निर्मितीची व्याप्ती मर्यादीत होते. परंतू तिचे मोल कमी होत नाही. आधुनिकतेचा संबंध काळाशी असतो. म्हणूनच काळाचे भान ठेवावेच लागते. अण्णाभाऊ साठे यांच्या कलानिर्मितीत चिरंतन मूल्ये नसेलही कदाचित, पण त्यांनी प्राचिन मराठी शाहिरीकाव्यात आधुनिकता आणली ही गोष्टही तितकीच महत्वाची आहे.

शाहिरी काव्यात लावण्या, पोवाडे आणि तमाशे असे प्रमुख लोककला प्रकार आहेत. या लोककला प्रकारात नृत्य, नाटय आणि संगीत या तिन्हीचा अंतर्भाव असतो. ऐतिहासीक दृष्टया आपणाला असे दिसते की, शाहिरी आणि शृंगाररस प्रधान तो तमाशा, समाजपरिवर्तनाशी व राजकीय क्रांतीशी तादाम्य पावून समाजातले चैतन्य शाहीर फुलवितो, तर शृंगाराचे आकर्षण ठेवून जनमाणसातील विकारांना तमासगिर चेतवतो असा परंपरागत समज होता. पेशवाईच्या काळात शाहिरीकाव्याला राजाश्रय मिळाला, विररसापेक्षा शृंगाराला अधीक वाव मिळून पोवाडया पेक्षा लावण्याच अधिक लिहिल्या गेल्या होत्या.

अण्णाभाऊ साठे यांनी समाजपरिवर्तनासाठी आणि क्रांतीसाठी लोकरंजनापेक्षा लोकशिक्षणासाठी आवश्यकता असते याचे भान ठेवून त्यांनी लावणी आणि तमाशा या रंजनकलेला लोकशिक्षणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. समाजात बदल घडविण्यासाठी लोकांत जागृती करावी लागते. सांघिक शक्ती निर्माण करावी लागते. असे जागृत व संघटित लोकच क्रांती करु शकतात अशा लोकांना क्रांतीप्रवण करण्याचं कार्य लोककलेच्या माध्यमातूनच होऊ शकतं याचं अण्णाभाऊना भान होत. म्हणूनच त्यांनी परंपरागत लोककला लोकशिक्षणाकडे वळविली. परंपरागत तामाशाची सुरावट त्यांनी घेतली आणि शाहिरीची नवी सजावट केली, या अर्थाने की, पोवाडे, लावण्या, गिते, गण इत्यादी रचनाबंध त्यांनी स्वीकारले व त्यात समकालीन वास्तव जिवनातला नवा आशय भरला हा नवा आशय समकालीन होता. वास्तवाधिष्टत होता. विषयदर्शी होता. उदा. अण्णाभाऊनी मुंबईची लावणी लिहीली. त्यात मुंबईच्या नागरी जिवनातील आर्थिक सामाजीक विषयाचे दर्शन घडवून मुंबईतील श्रमिकांच्या व पददलितांच्या वाटयाला आलेले दैन्य दारीद्रयाचे जिनं बदलून टाकण्यासाठी झुंज देण्याचा आदेश दिला आहे. यावरुन अण्णाभाऊची शाहीरी प्रतिभा कशी

वास्तववादी होती हे समजू शकते. त्यांची 'माझी मैना गावावर राहिली' ही लोकप्रिय लावणी संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाच्या पार्श्वभुमीवर लिहीली आहे. बायकोला गावी ठेवून मुंबईत कामगाराचे जिवन जगणारा एक सामान्य माणुस लढयात सामिल होतो तेव्हा पत्नी विरहाच्या जाणिवेनी त्याच्या मनाची काहिली लावणीतून व्यक्त होते. परंतु ही रुपकात्मक लावणी हया दृष्टीने तिचा अर्थ लक्षात घेतला म्हणजे बेळगाव, कारवार, उंबरगाव ईत्यादी परिसरातील महाराष्ट्राची हळहळ प्रत्ययाला येते.

परंपरागत लावणी बंधाला अण्णाभाऊनी समकालीन आशयाद्वारे नवे रुप दिले. परंपरागत रंजनप्रधान तमाशात गण, गवळण, बतावणी असे अंगभुत घटक होते. त्याचे स्वरुपच अण्णाभाऊनी बदलून टाकले. परंपरागत तमाशा गण म्हटला की त्यात गणेशवंदन, गणेशस्तवण, असेच अण्णाभांऊनी वंदन व स्तवण ठेवले पण अधिष्ठाण बदलले म्हणजे गणेशाऐवजी मातृभुमी, राष्ट्रवीर, हुतात्मे, देशभक्त यांना वंदन करुन त्यांचेच स्तवण केले आशीर्वाद मागीतला तो त्यांच्याच पेंग्याचे लग्न यातील त्यांचा गण पुढील प्रमाणे आहे

''प्रथम मायभूच्या चरणा, छत्रपती शिवचरणा
स्मरुणी गातो कवना !!
आढळून मनीही शुभनामे करुनीया स्तवणा
आशीर्वाद मागतो आम्ही गावया कवना
सभापती आणि सुजना !!

मलावंत आणि रसिकांनी स्फुर्ती द्यावी हिच प्रार्थना. परंपरागत तमाशातील गण झाला की गवळण असे पेंद्या संवगडी मथुरेच्या बाजारी जाणाऱ्या गवळणीची वाट अडवत मग गवळणीनी कृष्णाची आर्जव करण अण्णाभाऊनी नव्या तमाशातून गवळण हा प्रकारच काढुन टाकला. यातील पांचटपणा, चावटपणा, अश्लील विनोद याला थारा दिला नाही. त्यांनी गणा नंतर लगेच म्हणनीला स्थान दिले म्हणनी म्हणजेच प्रवेश परिचयाचे काव्यात्मक कथासुत्र असे, म्हणनीमधुन कथासुत्र लोकासमोर प्रस्तुत करण्याचा नवा प्रयोग त्यांनी केला.

अण्णाभाऊनी परंपरागत तमाशात आधुनिकता आणतांना तमाशाला लोकनाटयाचे रुप दिले. परंपरागत तमाशातील राजा, राणी प्रधान, सेनापती ही कल्पनारंजक पात्रे गेली त्यांच्या जागी गावकरी, शेतकरी, श्रमीक, पाटील, पुढारी ही वास्तववादी पात्रे पुढे आली. शोषक आणि शोषितातील संघर्ष, काळाबाजार, अन्नधान्य, टंचाई, महागाई, दैन्य दारीद्रय आणि कर्जबाजारीपणा, मतदान आणि निवडणुका हे लोकविषय पुढे आणले. यातुन सामाजिक चालिरितीच्या विरोधात लोकांनी उभे राहावे ही त्यांची भुमीका होती.

अण्णाभाऊच्या पेंग्याच्या लग्नामध्ये शहरात राहणारा राणू आपल्या गावात कुणबी सेवा संघ स्थापतो. त्यांच्यात जागृती निर्माण करतो, त्यामुळे पेंग्याच्या लगनतील सगळी विघ्ने दूर होतात असे दाखविले यातून त्यांची समाजप्रबोधनाची प्रचिती कळून येते.

अण्णाभाऊची वगनाटये सामान्य माणसाच्या जिवनाला स्पर्श करणारे असत, तसेच सामान्य माणसाच्या सुप्त भावनांना व विचारांना बोलत करणारे असत. 'पुढारी मिळाला' या वगनाटयात पुढारी वारेमाप आश्वासने देतो तेव्हा हजरजवाबी संतू त्याला लगेच म्हणतो

संतू : थापा
तुम्ही भराभर बोलता, पाझर फोडता,
साऱ्या लोकांना भुलवता गोड बोलुनि झुलवता
मंत्री होताच फटफट फटफट
गोळा चहुकडे चालवता''

हे ऐकताना आपल्याच मनात दडपलेले विचार आपणाला ऐकू येत आहेत असे प्रेक्षकांना वाटते. कारण अण्णाभाऊनी वगनाटयात निवडलेली पात्रे सामान्य माणसातूनच निवडलेली असतात. म्हणून प्रेक्षकाचे त्यांच्याशी चटकन आत्मीयतेचे नाते जोडले जाते. अण्णाभाऊची वगनाटय लोकप्रिय झाली त्याचे महत्वाचे हे एक कारण आहे. वगनाटय अथवा लोकनाटय हा प्रकार मुळातच प्रयोजनमुलक आणि प्रचारगर्भ आहे. परंतू त्यामुळे काही त्याची वाङःमयीन गुणवत्ता कमी होत नाही. विष्णुशास्त्री चिपळुणकर, गोपाळराव आगरकर, लोकमान्य टिळक ईत्यादीचे वर्तमानपत्र, अग्रलेख प्रासंगिक, प्रयोजनमुलक आणि प्रचारगीच होते. तरी कालांतराने त्यांना वैचारीक वाङःमय म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली. अण्णाभाऊची वगनाटये प्रचारकी असली तरी त्यांचे ऐतीहासीक महत्व कमी होत नाही, त्यांना वाङःमयीन प्रतिष्ठा मिळायला हवी.

अण्णाभाऊ साठे यांच्या समग्र वाङःमयात सामाजिक स्थित्यांतराच्या स्पष्ट पाऊलखुणा आपणास आढळून येतात. अण्णाभाऊ साठे यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता तरी त्यांनी आपले लेखन केवळ संघर्षापुरतेच केले नाही, मॅक्झिम गार्कीचा प्रभाव असला तरी त्यांनी हरीभाऊ आपटे, मामा वरेरकर, खांडेकर, भाटे यांचेही साहित्य वाचले होते. क्रांतीकारका इतकीच समाजसुधारणेची दृष्टी त्यांना लाभलेली होती. समाजसुधारणा व्हावी अशी आमच्या संघाची

मागणी आहे. असे अण्णाभाऊच्या पेंग्याचे लग्न या वगनाटयातील रानू म्हणतो,

''रुढीच्या अंधारी । खाल्या ठेचा भारी ।।
कर्जाच्या बोजानं । दबलो आजवरी ।।
ज्ञानाचा दिप नवा आज तेवला ।।

असे सगळे गावकरी म्हणतात पण जुन्या रुढी नष्ट होऊन समाजसुधारणा व्हावी आणि श्रमीकांच्या तसेच पददलितांच्या घरोघरी ज्ञानाचा दिवा तेवावा अशी अण्णाभाऊची तळमळ होती. याबाबतीत अण्णाभाऊ नुसते स्वप्नेच पाहत नव्हते तर ती स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून लोकजागृती करीत होते. याचसाठी त्यांनी परंपरागत तमाशा कलेला नवे रुप दिले. परंपरात वगनाटयात नवा आशय भरला, अकलेची गोष्ट, बेकायदेशीर लोकमंत्री, दे. भ. घोटाळे, पेंग्याचे लग्न, दुष्काळात तेरावा, पुढारी मिळाला, माझी मुंबई, बिलंदरबुडवे ही त्यांची सगळीच वगनाटये त्या त्या काळात महाराष्ट्रात लोकप्रिय झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या काळात माझी मुंबई ही वगनाटय खुपच गाजले, त्या लढयात हजारो संभातून व्याख्यानाद्वारे जे कार्य झाले त्यापेक्षा अधीक कार्य अण्णाभाऊ साठे यांच्या वगनाटयातून झाले हे ऐतीहासीक सत्य आपणास मान्य करावे लागेल. लोकांचे जिव्हाळयाचे प्रश्न सुटसुटीत आणि चुरचुरीत संवाद पात्राचा हजरजबाबीपणा त्यातून निर्माण होणारे खुसखुसीत हास्यविनोद शासकीय पुढाऱ्यावरील वृत्ती–प्रवृत्ती उपहास ही अण्णाभाऊच्या वगनाटयाची खास वैशिष्टये आहेत. वर्गीयझगडयांना त्यांनी आपल्या वगनाटयातून महत्वाचे स्थान दिले. 'पेंग्याचे लग्न' मधील गावकरी आणि राणू यांच्या सवाल जवाबातून आपणास कळू शकते.

परंपरागत तमाशा कलेला जे निकृष्ट रुप प्राप्त झाले होते याची खंत त्यांना सातत्याने वाटत होती म्हणून या कलेला त्यांनी नवे रुप देण्याचा प्रयत्न केला. जो पर्यंत तमाशा कनाती बाहेर येत नाही तोपर्यंत त्या सुधारणते कोणला यश हेईल असे वाटत नाही. असे खेदाचे उद्‌गार त्यांनी काढले होते. अण्णाभाऊनी तमाशाला कनाती बाहेर काढुन लोकनाटयाचे रुप देण्यात निश्चित यश मिळवले होते. म्हणूनच त्यांना लोकनाटयाचे जनक म्हटले जाते. महामहोपाध्याय, द.वा. पोतदार, प्रा. न.र. फाटक, मामा वरेरकर प्रभुतीनी तमाशा सुधारणा समितीती अण्णाभाऊना खास स्थान दिले होते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या विविध वगनाटयातून सामाजिक बांधिलकी सातत्याने जपली होती व रसिकांनीही या यथार्थवादी वगनाटयास सामाजिक प्रबोधनाचे वास्तवाचे हत्यार म्हणून आत्मसात केले होते.

निष्कर्ष :–

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी काव्याला वास्तवाची व सामाजिक बांधीलीची जोड होती. त्यांनी तमाशाची पारंपारीक चौकट बदलून त्यास लोकशिक्षणाचे, लोकजागृतीचे हत्यार बनविले. समकालीन वास्तवाला त्यांनी तमाशा प्रकारातून स्थान दिले. परंपरागत लावणी व वगनाटयाला बदलून त्यांनी या प्रकारात मातृभुमी, राष्ट्रवीर, हुतात्मे, देशभक्त यांना वंदन करुन त्यांच्या प्रेरणा जनतेसमोर अभिव्यक्त केल्या. आपल्या वगनाटयातून गरीब शेतकरी, श्रमिक, मजुर उपेक्षीत माणसाचे अंतरंग त्यांनी प्रभावीपणे मांडले. आपल्या वाङःमयातुन सामाजिक स्थित्यंतरे, समाजसुधारणा, श्रमिक, पददलित व वंचितांचा नवा अन्वयार्थ त्यांनी मांडल्याचे स्पष्ट होते.

संदर्भ :–

1.झंझावात : स्मरणिका, अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन, जालना 2010 संपादक प्रा. कन्हैया पाटोळे पृष्ठ क्र 23
2.अण्णाभाऊ साठे जिवन आणि साहित्य : अण्णाभाऊ साठे साहित्य प्रकाशन मंच, नानासाहेब कठाळे, नागपुर 1996 पृष्ठ क्र 45
3.अण्णाभाऊ साठे – डॉ अश्रु जाधव, अस्मिता प्रकाशन नागपुर पृष्ठ क्र 62
4.अण्णाभाऊ साठे समग्र वाङःमय, संपा. निला उपाध्ये, वसुंधरा पेंडसे नाईक, डॉ सुभाष सावरकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई 2006 पृष्ट क्र 145
5.साहित्य शिरोमणी विशेषांक, संपा धोंडोपंत मानवतकर 2011 पृष्ट क्र 38
6.अण्णाभाऊ साठे समाज विचार आणि साहित्य विवेचन, बाबुराव गुरव, लोकवाङःमयगृह प्रकाशन मुंबई 1999 पृष्ट क्र 87